प्रेस नोट - ०१ दिनांक १६/०१/२०२४

## ८ अग्निशस्त्र १५ जीवंत काडतुसांसह दोन आरोपीतांस अटक केलेबाबत...

दिनांक १३/०१/२०२४ रोजी शस्त्राबाबत गुप्त माहिती मिळाली. सदर माहितीची शहानिशा करून पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ६ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथक तयार करण्यात आले.

सदर पथकाने मिळालेल्या माहितीची अनुषंगाने सापळा रचून शस्त्रासह आलेल्या चेतन संजय माळी, वय २६ वर्षे यास ४ अग्निशस्त्र व ८ जिवंत काडतुसासह ताब्यात घेतले. त्याचे विरोधात ट्रॉम्बे पोलीस ठाणेस कलम ३,५,२५ शस्त्र अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आरोपी चेतन माळी याचेकडून पोलीस कोठडी दरम्यान तपासाअंतर्गत ३ अग्निशस्त्र व ५ जिवंत काडतुसे कल्याण परिसरातून हस्तगत करण्यात आली. तसेच तो सिनु नरसय्या पडिगेला, वय ४८ वर्षे याचे सतत संपर्कात असल्याने त्यास अटक करुन पोलीस कोठडी दरम्यान तपासाअंतर्गत त्याचेकडून ०१ अग्निशस्त्र व ०२ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आले आहे.

सध्या दोनही आरोपी सध्या पोलीस कोठडी रिमांडमध्ये आहे. अटक आरोपींकडून अद्यापपावेतो **एकूण ०८ अग्निशस्त्रे व १५ जिवंत काडतुसे** हस्तगत करण्यात आली असून, पुढील तपास पोउनि शरद नाणेकर व पथक करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, श्री विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, श्री देवेन भारती, मा. सह पोलीस आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, श्री सत्य नारायण चौधरी, मा.अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री विनायक देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त, श्री हेमराजसिंह राजपूत, सहा. पोलीस आयुक्त ट्रॉम्बे विभाग श्री सुहास हेमाडे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री अनंत शिंदे, प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक ट्रॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई, यांचे नेतृत्वाखाली पोउनि शरद नाणेकर, पोउनि विजयसिंह देशमुख, पोउनि अजय गोल्हार, सफौ धुमाळ, पोह लेंभे, पोह आव्हाड, पोह राणे, पोह पाटील, पोह पिंजारी, पोशि देशमुख, पोशि सुरवसे, पोनाचा शिंदे यांनी केलेली आहे.

........................